(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयचा मराठी अनुवाद)

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

(न्या. अभय एस. ओक आणि न्या. राजेश बिंदल यांचेसमोर)

चरण सिंग उर्फ चरणजित सिंग —-------- अपीलकर्ता

विरुद्ध

उत्तराखंड राज्य —--------- उत्तरवादी

फौजदारी अपील क्रमांक ४४७ / २०१२

घोषित केल्याचा दिनांक - एप्रिल २०, २०२३

प्रस्तुत प्रकरणामध्ये उपस्थित असणारे वकिल :

अपीलकर्त्याकरिता - श्री. शुभ्रांशु पधी, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता (न्यायमित्र)

डॉ. (सौ.) विपीन गुप्ता, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता

उत्तरवादीकरिता - श्री. जतिंदर कुमार भाटिया, अभिलेखावरील नियुक्त अधिवक्ता

श्री. कृष्णाम मिश्रा, वकिल

श्री. परम कुमार मिश्रा, वकिल

सदर न्यायनिर्णय न्या. राजेश बिंदल यांच्याद्वारे पारित - प्रस्तुतचे अपील हे अपीलकर्ता, जो

मयतचा पती होता त्याने, भारतीय दंड संहिता, १८६० (संक्षिप्ततेसाठी 'भा.दं.सं') च्या कलम ३०४ बी, ४९८ ए आणि २०१ अंतर्गत त्याची अपराधसिद्धी आणि त्याला सुनावण्यात आलेल्या शिक्षेला आव्हान देणारे अपील दाखल केले आहे. न्यायचौकशी न्यायालयाने अपीलकर्त्याला कलम ३०४ ब अन्वये १० वर्षे, कलम ४९८ अ अन्वये २ वर्षे आणि भादंवि कलम २०१ अन्वये २ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली होती. परंतु, नैनीताल येथील उत्तराखंड उच्च न्यायालयाने भा.दं.सं च्या कलम ३०४ बी अन्वये अपीलकर्त्याची शिक्षा दहा वर्षांवरून सात वर्षे इतकी कमी केली होती.

२. अपीलकर्ता आणि मयत छिलो कौर यांचा विवाह सन १९९३ मध्ये झाला होता. मयत ही सासरच्या घरी राहत होती. दिनांक २४/६/१९९५ रोजी सायंकाळी ६. १५ वाजता मयताचे वडील प्रताप सिंह (स. सा. १) यांनी पी. एस. जसपूर यांच्याकडे तक्रार दाखल केली ज्यामध्ये असे कथन केले होते की, साधारण दोन वर्षांपूर्वी त्यांची मुलगी छिलो कौर हिचा विवाह अपीलकर्त्याशी झाला होता. लग्नात त्यांनी आपल्या हैसियतनुसार पुरेसा हुंडा दिला होता. लग्नानंतर दोन महिन्यानंतर त्यांची मुलगी तिच्या आई-वडिलांच्या आली आणि फिर्यादी (स. सा. १) याना सांगितले की, हुंड्यात मोटारसायकल दिली गेली नसल्याने तिच्या सासरचे लोक मोटारसायकल आणण्यास सांगत आहेत. फिर्यादीने आपल्या मुलीला असे समजावले, सध्या ते मोटारसायकल घेऊन देण्यास सक्षम नाहीत, मात्र, जेव्हाही, ते घेऊन देण्याच्या स्थितीत असतील तेव्हा ते नक्कीच घेऊन देतील आणि आपल्या मुलीला तिच्या सासरच्या घरी परत पाठवले. त्यानंतर, जेव्हा जेव्हा त्यांची मुलगी आई-वडिलांच्या घरी यायची तेव्हा ती मोटारसायकलच्या मागणीबद्दल बोलायची आणि त्यानंतर लग्नानंतर सुमारे एक वर्षानंतर

जमिनीसाठी सुद्धा मागणी केली जायची. प्रत्येक वेळी ते आपल्या मुलीला समजावत असत आणि तिला परत पाठवत असत. आदल्या दिवशी म्हणजे दिनांक २३.६.१९९५ रोजी भोगपूर धाम गावातील ज्या गावात फिर्यादीची मुलगी तिच्या लग्नानंतर राहत होती त्या गावातील जगीरसिंग ही व्यक्ती फिर्यादीकडे आली आणि असे सांगितले की, त्याची मुलगी छिलो कौर हिची हत्या तिच्या सासरच्या व्यक्तींनी केली आहे. सदर माहिती मिळताच, दिनांक २४/६/१९९५ रोजी फिर्यादी आपल्या पत्नीसह भोगपूर धाम येथे आले आणि त्यांना हे समजताच धक्का बसला की, दिनांक २२/६/१९९५ रोजी साधारण सकाळी ८.०० वाजता त्यांच्या मुलीला पती चरणसिंग (यातील अपीलकर्ता), दिर गुरमीत सिंग (आरोपी क्र.२) आणि सासू संतो कौर (आरोपी क्र.३) यांनी मारहाण करून गळा दाबून ठार मारले. त्यांनी फिर्यादीस न कळविता मृतदेहावर अंत्यसंस्कार केले होते. हुंड्यामध्ये मागण्यात आलेल्या मोटारसायकल आणि जमिन याची पूर्तता न केल्याने तिची हत्या करण्यात आली. सदर प्रकरणात तपास करण्यात आला आणिचरण सिंग, गुरमीत सिंग आणि संतो कौर यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले.

**३.** अभियोग पक्षाने सहा साक्षीदार यांची तपासणी तर बचाव पक्षाने एक साक्षीदार तपासला. न्यायचौकशी न्यायालयाने पुराव्यांचे मूल्यमापन केल्यानंतर, चरण सिंग (अपीलकर्ता), गुरमीत सिंग आणि संतो कौर यांना भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी, ४९८ ए आणि २०१ अंतर्गत दोषी ठरवले आणि त्यांना भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी अंतर्गत दहा वर्षे सश्रम कारावासाची , भा.दं.सं. च्या कलम ४९८ ए अंतर्गत दोन वर्षे सश्रम कारावास आणि भा.दं.सं. च्या कलम २०१ अंतर्गत दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. दोषींनी उच्च

न्यायालयात दाखल केलेल्या अपीलामध्ये गुरमीत सिंग (मेहुणा) आणि संतो कौर (सासू) यांना भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी, ४९८ ए आणि २०१ अन्वये यांची अपराधसिद्धी आणि शिक्षा रद्द करण्यात आली आणि त्यांची आरोपातून मुक्तता करण्यात आली, तर अपीलकर्त्याची शिक्षा कायम ठेवण्यात आली. मात्र, अपीलकर्त्याला भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी अन्वये सुनावण्यात आलेली दहा वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा कमी करून सात वर्षे करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या वरील न्यायनिर्णयालाच प्रस्तुतच्या अपीलमध्ये आव्हान देण्यात आले आहे.

**४.** अपील दाखल करणाऱ्या वकिलाच्या अनुपस्थितीमुळे न्यायमित्र म्हणून न्यायालयाला मदत करण्याची विनंती करण्यात आलेले विद्वान वकील शुभ्रांशु पाधी यांनी सादर निवेदन केले की, अपीलकर्त्याची अपराधसिद्धी आणि शिक्षा ही कायदेशीररित्या किंवा भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी किंवा ४९८ ए आयपीसी अन्वये कायम करता येत नाही. भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी अन्वये गृहीत धरण्याची पूर्वआवश्यकता अशी आहे की, मृत्यूपूर्वी हुंड्याच्या कोणत्याही मागणी संबंधात किंवा त्याअनुषंगाने मृत व्यक्तीला क्रूर वागणूक दिली गेली किंवा तिचा छळ करण्यात आला होता. हुंडाबळी संदर्भात भारतीय पुरावा कायदा, १८७२ च्या कलम ११३ बी (संक्षिप्ततेसाठी 'आय ई ए') नुसार असे गृहीतक तेव्हाच उपस्थित केले जाऊ शकते जेव्हा असे दिसून येते की, जेव्हा मृत्यूपूर्वी अशा महिलेवर हुंड्याच्या मागणीसाठी किंवा त्या अनुषंगाने क्रूर वागणूक दिली गेली होती किंवा छळ करण्यात आला होता.

**५.** जर अभियोग पक्षाने दाखल केलेले पुरावे तपासले तर भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी किंवा ४९८ ए अन्वये दोषसिद्धीचा कोणताही गुन्हा दाखल होऊ शकत नाही कारण कोणत्याही

साक्षीदाराने मृत महिलेचा छळ करण्यात आला होता किंवा तिला क्रूर वागणूक देण्यात आली होती किंवा मृत्यूपूर्वी हुंड्याची मागणी करण्यात आली होती असे नमूद केलेले नाही. सदरचा विवाह हा १९९३ साली झाला होता आणि दिनांक २२/६/१९९५ रोजी मयत मृत पावली होती. हुंड्याच्या मागणी संदर्भात मृत महिलेच्या मृत्यूपूर्वी झालेल्या छळाबाबत तिचे वडील, आजी किंवा मामा यांचेसह तिच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने काहीही सांगितलेले नाही. वस्तुतः, मृताच्या गावापासून सुमारे एका फरलॉन्ग अंतरावर राहणारी तिची आजी आणि दोन मामा तिच्या अंत्यसंस्काराच्या वेळीही उपस्थित होते. त्यांनी पोलिसांत तक्रार देऊन किंवा अन्य प्रकारे कोणताही मुद्दा उपस्थित केला नाही. वस्तुतः, तिची आजी आणि दोन मामा यांची अशी कबुली दिली की, अंत्यसंस्कारानंतर पंचायतीच्या मध्यस्थीने त्यांनी हुंड्यातील सर्व गोष्टी एकत्र जमा केल्या होत्या. पुढे असे सादर करण्यात आले होते की, मृताच्या वडिलांदेखील जे प्रत्यक्षात सुमारे २९० किलोमीटर अंतरावर राहत होते त्यांना तिच्याबद्दल कळविण्यात आले होते. मात्र, मयताच्या वडिलांच्या आगमनाची प्रतीक्षा असल्याने अंत्यसंस्काराला उशीर होऊ शकला नाही.

**६.** पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, जगीर सिंग नावाचा एक महत्वपूर्ण साक्षीदार ज्याच्या उल्लेख फिर्यादीने एफ.आय.आर. मध्ये केला होता, त्या साक्षीदारालाअभियोग पक्षाने पुराव्यामध्ये हजर केले नाही. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार ती अशी व्यक्ती आहे जी भोगपूर धाम गावची रहिवासी आहे, जिथे मयत तिच्या सासरच्या घरी राहत होती. त्या व्यक्तीने फिर्यादीला त्याच्या मुलीच्या मृत्यूची माहिती दिली होती. या साक्षीदाराला अभियोग पक्षाने का अडवून ठेवले? स. सा. - ६ म्हणून हजर झालेल्या आय.ओ.बब्बन सिंह यांच्या जबाबानुसार,

तपासादरम्यान जगीर सिंग यांचा जबाब नोंदविण्यात आला. जर भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी, ४९८ ए आणि आय ई ए च्या कलम ११३ बी मधील घटक स्पष्ट झाले नाहीत, तर हुंडाबळीचे कोणतेही गृहीतक उपस्थित करता येत नाही. युक्तिवादाच्या समर्थनार्थ, बैजनाथ वि. म.प्र.राज्य[1] या प्रकरणावर भिस्त ठेवण्यात आली. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपीलकर्ता, त्याचा भाऊ आणि आई यांच्यावरील आरोप हे सारखेच होते. तथापि, त्याच्या भावाची आणि आईची निर्दोष मुक्तता करण्याविरुद्ध, राज्याने कोणतेही अपील दाखल केलेले नाही आणि अपीलकर्त्याच्या पत्नीचा मृत्यू हा अनैसर्गिक नव्हता कारण ती फिट्स च्या आजाराने ग्रस्त होती. तिच्या उलटतपासणी मध्ये,आजीने मृत महिलेला फिट्स चा त्रास असल्याची कबुली दिली होती.

**७.** दुसरीकडे, राज्याच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील यांनी सादर केले की, हे प्रकरण आहे ज्यामध्ये, हुंड्याच्या हव्यासापोटी सासरच्या लोकांनी एका तरुणीची हत्या केली. सदरचे लग्न हे अवघ्या दोन वर्षांचे होते आणि मृत्यू हा अनैसर्गिक होता. मयताच्या आई-वडिलांना न कळविता मयत मुलीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.आजी आणि दोन काका जे मयताच्या अंत्यसंस्काराच्या वेळी उपस्थित होते त्यांनी मृताच्या शरीरावर जखमांच्या खुणा आणि तुटलेला दातही बघितला होता. त्यांना धमकावण्यात आल्याने, ते तक्रार दाखल करू शकले नाहीत. हा मृत्यू सासरच्या घरात झाला आहे, त्यामुळे सदरचे गृहीतक फेटाळून लावण्याची पूर्ण जबाबदारी अपीलकर्त्यावर आहे. अभियोग पक्षाने सादर केलेल्या साक्षीदारांच्या जबाबांच्या स्वरूपात अपीलकर्त्याकडून वारंवार हुंड्याची मागणी करण्यात आल्याचे पुरेसे पुरावे पटलावर उपलब्ध आहेत. उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयात कोणतीही

1 (२०१७) १ एससीसी १०१

त्रुटी नाही. भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी मध्ये तरतुद केल्यानुसार, अपीलकर्त्याची शिक्षा दहा वर्षांवरून कमीत कमी सात वर्षांपर्यंत कमी करून उच्च न्यायालयाने यापूर्वीच पुरेशी तत्परता दाखविली आहे.

८. दोन्ही बाजूंच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील यांचे म्हणणे ऐकले आणि संबंधित अभिलेखाचे अवलोकन केले.

९. सन १९९३ साली अपीलकर्त्याचा विवाह मयत व्यक्तीशी झाला होता. दिनांक २२/६/१९९५ रोजी तिचा मृत्यू झाला. दिनांक २४/६/१९९५ रोजी मयत व्यक्तीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून यातील अपीलकर्ता चरण सिंग, दीर गुरमीत सिंग आणि सासू संतो कौर यांच्याविरोधात एफ.आय.आर दाखल करण्यात आला होता. मात्र, दोषी व्यक्तींनी उच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या अपीलमध्ये दीर गुरमीत सिंग आणि सासू संतो कौर यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली, तर अपीलकर्त्याची शिक्षा कायम ठेवण्यात आली. भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी अन्वये अपीलकर्त्याला सुनावण्यात आलेली दहा वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा सात वर्षे सश्रम कारावास पर्यंत कमी करण्यात आली. भा.दं.सं. कलम ४९८ ए आणि कलम २०१ अन्वये प्रत्येकी दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा कायम करण्यात आली.

**१०.** लग्नाच्या सात वर्षांच्या आत हुंडाबळी संदर्भात भा.दं.सं.च्या कलम ३०४ बी आणि ४९८ ए अंतर्गत अपीलकर्त्याला दोषी ठरवण्यात आले आहे. पक्षकारांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी मांडलेला युक्तिवादाचे आकलन करण्यासाठी भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी आणि कलम ४९८ ए तसेच भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ११३ बी चे अवलोकन करणे

आवश्यक आहे. त्याचा उतारा खालीलप्रमाणे आहे :-

**"३०४ बी - हुंडाबळी** - १) ज्या वेळी एखाद्या विवाहित स्त्रीचा मृत्यू विवाहापासून सात वर्षाचे आत घडून आला आहे आणि तो जाळपोळ करून, अगर दुखापत करून, अगर नेहमीपेक्षा इतर परिस्थितीत घडून आलेला आहे आणि असे दाखवून देण्यात आले की तिच्या मृत्यूपूर्वी तिला क्रूरपणे वागविले जात होते अगर जाच छळवणूक होत होती आणि तो तिचा नवरा, अगर नातेवाईक करत होते आणि त्यामागे हुंड्याची मागणी करत होते, तर अशा मृत्यूस हुंडाबळी असे म्हंटले जाईल आणि नवऱ्याने आणि नातेवाईकांनीच तो मृत्यू घडवून आणला आहे असे मानले जाईल.

स्पष्टीकरण - या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ "हुंडा" याचा अर्थ सन १९६१ च्या हुंडा प्रतिबंध, कायद्याच्या कलम २ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे घेणे आहे.

२) जो कोणी हुंडाबळीचा अपराध करील त्याला सात वर्षांपर्यंत कमी नाही इतक्या मुदतीच्या कारावासाची परंतु आजन्म कारावासाची असू शकेल इतक्या मुदतीची शिक्षा होऊ शकेल.

**४९८-ए - एखाद्या स्त्रीच्या पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी तिला क्रूर वागणूक देणे** - जो कोणी एखाद्या स्त्रीचा पती असून किंवा पतीचा

नातेवाईक असून, अशा स्त्रीला क्रूर वागणूक देईल त्याला, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

स्पष्टीकरण - या कलमाच्या प्रयोजनार्थ “क्रूर वागणूक देणे” याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :-

(क) ज्यामुळे स्त्रीला आत्महत्या करणे क्रमप्राप्त होईल अथवा तिला दुखापत होईल अथवा तिच्या जीविताला, अंगाला किंवा स्वास्थ्याला (मानसिक किंवा शारीरिक) धोका निर्माण होईल अशा तऱ्हेचे कोणतेही बुद्धीपुर:सर वर्तन ;

(ख) जेव्हा त्या स्त्रीवर किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर कोणत्याही मालमत्तेची किंवा मूल्यवान रोख्याची बेकायदेशीर मागणी पूर्ण करण्याची जबरदस्ती करण्याच्या हेतूने अथवा अशी मागणी पूर्ण करण्यात तिच्याकडून किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तीकडून कसूर झाल्याबद्दल तिला सतावले जाते तेव्हा, अशी सतवणूक.

**११३ बी - विवाहित स्त्रीला आत्महत्या करण्यास अपप्रेरणा देण्यासंबंधीचे गृहीतक** - जेव्हा विवाहित स्त्रीने केलेल्या आत्महत्येला तिच्या पतीने किंवा तिच्या पतीच्या कोणत्याही नातेवाईकाने अपप्रेरणा

दिली होती काय असा प्रश्न उद्भवला असेल आणि तिने आपल्या विवाहाच्या तारखेपासून सात वर्षांच्या कालावधीत आत्महत्या केली आहे व तिचा पती किंवा तिच्या पतीचा असा नातेवाईक याने तिला क्रूर वागणूक दिली होती हे दाखवून देण्यात येईल तेव्हा, त्या प्रकरणाची इतर सर्व परिस्थिती लक्षात घेऊन न्यायालयाला असे गृहीत धरता येईल की, असा आत्महत्येस तिच्या पतीने किंवा तिच्या पतीच्या अशा नातेवाईकाने अपप्रेरणा दिली होती.

स्पष्टीकरण - या कलमाच्या प्रयोजनार्थ, “क्रूर वागणूक देणे” याला ‘भारतीय दंड संहिता’ (१८६० चा ४५) च्या कलम कलम ४९८ ए यामध्ये दिल्याप्रमाणे तोच अर्थ असेल.

**११.** भा.दं.वि. च्या कलम ३०४ बी आणि ४९८ ए या कलमांची अर्थउकल बैजनाथच्या प्रकरणात (उपरोल्लेखित) विचारार्थ घेण्यात आला होता. त्यातील परिच्छेद २५ ते २७ मध्ये या मताचा सारांश देण्यात आला आहे, ज्याचा उतारा खालीलप्रमाणे दिला आहे:-

"**२५.** ज्याअर्थी संहितेच्या कलम ३०४-बी ने परिभाषित केलेल्या हुंडाबळीच्या गुन्ह्यातील घटक पुढीलप्रमाणे आहेत.

(i) संबंधित महिलेचा मृत्यू कोणतीही जाळपोळ करून किंवा दुखापतीमुळे किंवा नेहमीपेक्षा इतर परिस्थितीत

घडून आलेला आहे आणि

(ii) सदरचा मृत्यू हा तिच्या लग्नानंतर सात वर्षांच्या आत आहे, आणि

(iii) तिच्या मृत्यूपूर्वी तिला क्रूरपणे वागविले जात होते अगर जाच छळवणूक होत होती आणि तो तिचा नवरा, अगर नातेवाईक करत होते आणि त्यामागे हुंड्याची मागणी होती.

संहितेच्या कलम ४९८-ए अंतर्गत गुन्हा हा पतीने किंवा पतीच्या नातेवाईकाने तिला क्रूर वागणूक देणे याच्या क्षमतेमध्ये मोडतो. या कलमाचे स्पष्टीकरण हे “क्रूरता” या शब्दाची व्याख्या स्पष्ट करून सांगते ते पुढीलप्रमाणे :

(i) ज्यामुळे स्त्रीला आत्महत्या करणे क्रमप्राप्त होईल अथवा तिला दुखापत होईल अथवा तिच्या जीविताला, अंगाला किंवा स्वास्थ्याला (मानसिक किंवा शारीरिक) धोका निर्माण होईल अशा तऱ्हेचे कोणतेही बुद्धीपुर:सर वर्तन ;

(ii) जेव्हा त्या स्त्रीवर किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या

कोणत्याही व्यक्तीवर कोणत्याही मालमत्तेची किंवा मूल्यवान रोख्याची बेकायदेशीर मागणी पूर्ण करण्याची जबरदस्ती करण्याच्या हेतूने अथवा अशी मागणी पूर्ण करण्यात तिच्याकडून किंवा तिच्याशी संबंधित असल्येल्या व्यक्तीकडून कसूर झाल्याबद्दल तिला सतावले जाते तेव्हा, अशी सतवणूक.

२६. स्पष्टपणे, अशा तऱ्हेने, हुंड्याची मागणी म्हणून किंवा त्या अनुषंगाने कोणत्याही मालमत्तेची किंवा मौल्यवान सुरक्षेची मागणी करण्यासाठी किंवा त्याअनुषंगाने पती किंवा त्याच्या नातेवाईकाकडून महिलेवर होणारे अत्याचार किंवा छळ हा दोन्ही गुन्ह्यांचा समान घटक आहे.

२७. हुंडाप्रतिबंधक कायदा, १९६१ च्या कलम २ प्रमाणेच "हुंडा" या शब्दाचा अर्थ अध्यादेशित करण्यात आला आहे. "क्रुरता" या शब्दाची व्याख्या स्पष्ट केल्याप्रमाणे या शब्दाच्या विस्तारात, यातना देणाऱ्या व्यक्तीच्या वर्तन व्यतिरिक्त, त्यातुन उद्भवणारे परिणाम त्या स्त्रीला भोगावे लागतात. हुंड्याच्या मागणीसाठी किंवा त्याअनुषंगाने पती किंवा त्याच्या कोणत्याही नातेवाईकाकडून होणारी क्रूरता किंवा छळ हे दोन्ही गुन्ह्यांचे गांभीर्य आहे.

**१२.** वरील प्रकरणही हुंडाबळीशी संबंधित असल्याने भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ११३ बी अंतर्गत गृहीतकावर वरील निकालाच्या परिच्छेद २९ ते ३१ मध्येही सविस्तर चर्चा करण्यात आली होती. सदर उतारे हे पुढीलप्रमाणे आहेत:-

**"२९.** विशेष म्हणजे हा अंदाजही गुन्ह्यात आरोपी असलेल्या व्यक्तीने हुंड्याच्या मागणीसाठी किंवा त्याअनुषंगाने मृत महिलेवर अत्याचार किंवा छळ केल्याच्या पुराव्यावर आधारित आहे. अशा प्रकारे हुंडाबळीचा अंदाज आरोपीकडून हुंड्याच्या मागणीसाठी किंवा त्याअनुषंगाने मृत महिलेवर अत्याचार किंवा छळ करण्यात आला होता आणि तोही मृत्यूच्या रास्त निरंतरतेत, या पुराव्यानंतरच सक्रिय होईल. अशा प्रकारे असा पुरावा म्हणजे त्याच्यावर आरोप असलेल्या व्यक्तीने हुंडाबळीचा गुन्हा घडवून आणल्याचा कायदेशीर दृष्ट्या निश्चित केलेला अंदाज लागू करणे ही कायद्याने बंधनकारक पूर्वअट आहे.

**३०.** या तीन तरतुदींचे एकत्रित वाचन केल्यास आरोपींविरुद्ध कायद्याच्या कलम ११३-बी मध्ये नमूद केलेल्या गृहीतकाचा लाभ घेण्यासाठी प्रत्यक्ष व खात्रीशीर पुराव्यांद्वारे दोन्ही गुन्ह्यांचे घटक निर्विवादपणे सिद्ध करण्याचा अभियोग पक्षावर भार पडतो. पती किंवा त्याचे नातेवाईक किंवा आरोपी व्यक्तीकडून क्रूर वागणुक किंवा छळ केल्याचा पुरावा म्हणजे कायदेशीर गृहीतकाला छेद देणे आणि आरोपी

व्यक्तीला त्याच्या घेऱ्यात ओढणे ही अपरिहार्य बाब आहे. अशी वस्तुस्थिती सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्ष सबळ, सुसंगत आणि खात्रीशिर पुराव्यांद्वारे सिद्ध करण्यात अपयशी ठरल्यास, पुराव्यातील कमतरता दुर्लक्षित करून केवळ गृहीतकाचा आश्रय घेऊन वरीलपैकी कोणत्याही गुन्ह्यातील आरोपी व्यक्तीला दोषी ठरवता येणार नाही.

**३१.** सासरच्या घराच्या संरक्षक चौकटीत अनेकदा व्यावहारिकदृष्ट्या दुर्गम असलेल्या जीवनाच्या पुराव्यांच्या कठोरतेतून सुटका करणे आणि परिणामी पोकळी भरून काढणे, आरोप असलेल्या व्यक्तीविरुद्धच्या गृहीतकानुसार खटला चालविणे आणि त्याचे अपयश सिद्ध करण्यात अपयशी ठरल्यास क्षमा करणे आणि संबंधित कलमांमध्ये नमूद केलेली मूलभूत तथ्ये याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही, ,अन्यथा न्याय हा बळी ठरेल".

**१३.** भा.दं.सं. च्या कलम ३०४ बी आणि भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ११३ बी यांचे एकत्रित वाचन उपरोक्त न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ३२ मध्ये करण्यात आले होते, ज्याचा उतारा खालीलप्रमाणे आहे:-

**"३२.** या न्यायालयाने अनेकदा संहितेच्या कलम ३०४-ब आणि कायद्याच्या कलम ११३-ब च्या व्याप्ती आणि आशयावर भाष्य करताना असे प्रतिपादन केले आहे की, अभियोग पक्षाने प्रथम शिंडो वि. पंजाब

राज्य मधील कलम ३०४-ब मधील गुन्ह्याचे घटक स्पष्ट केले आहेत . [शिंडो वि. पंजाब राज्य, (२०११) ११ एससीसी ५१७ : (२०११) ३ एससीसी (क्रि.) ३९४] आणि राजीव कुमार वि. हरियाणा राज्य [राजीव कुमार वि. हरियाणा राज्य, (२०१३) १६ एससीसी ६४० : (२०१४) ६ एससीसी (क्रि.) ३४६] . नंतरच्या निकालात, या न्यायालयाने असे प्रतिपादन केले की, संहितेच्या कलम ३०४-बी अंतर्गत हुंडाबळीचा एक आवश्यक घटक असा आहे की, आरोपीने मृत्यूपूर्वी हुंड्याच्या मागणीसंदर्भात महिलेवर अत्याचार केले असावेत आणि हा घटक अभियोग पक्षाने वाजवी संशयापलीकडे सिद्ध केला पाहिजे आणि त्यानंतरच न्यायालय असे गृहीत धरेल की, आरोपीने कायद्याच्या कलम ११३-ब अन्वये हुंडाबळीचा गुन्हा केला आहे. के. प्रेमा एस. राव वि. यादला श्रीनिवास राव [के. प्रेमा एस. राव वि. याडला श्रीनिवास राव, (२००३) १ एससीसी २१७ : २००३ एससीसी (क्रि.) २७१] या खटल्यातील या न्यायालयाच्या आधीच्या निर्णयाचा उल्लेख मान्यतेने करण्यात आला. कलम ३०४-ब मधील तरतुदींकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी, गुन्ह्याचा एक मुख्य घटक जो स्थापित करणे आवश्यक आहे ते म्हणजे "तिच्या मृत्यूच्या लगेचच" तिच्यावर "हुंड्याच्या मागणीसंदर्भात" क्रूर वागणुक दिली गेली आणि छळ केला गेला.”

**१४.** वर नमूद केल्याप्रमाणे कायदेशीर स्थितीच्या संदर्भात, हे प्रकरण आता तपासून पाहणे आवश्यक आहे की हातात असलेले प्रकरण अशा प्रकारच्या श्रेणीत येते की नाही जेथे अपीलकर्त्याविरुद्ध अंदाज उपस्थित केला जाऊ शकतो ज्यामुळे, अभियोग पक्षाला आपली बाजू सिद्ध करण्यापासून मुक्त केले जाऊ शकते आणि त्याची जबाबदारी आरोपी/ अपीलकर्त्यावर टाकली जाऊ शकते.

**१५.** मृताच्या मृत्यूची तारीख २२/६/१९९५ आहे. त्याच दिवशी तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अपीलकर्त्याने घेतलेली भूमिका अशी होती की, मृतांच्या पालकांना माहिती देण्यात आली होती जे सुमारे २९० किमी अंतरावर राहत होते. मात्र, ते वेळेवर पोहोचू शकले नाहीत. पुढे असे सादर निवेदन करण्यात आले की, जेव्हा मृत महिलेचा मृत्यू झाला तेव्हा तिच्या सासरच्या निवासस्थानापासून सुमारे एक फूट अंतरावर राहणारे आजी व दोन मामा अंत्यसंस्काराच्या वेळी उपस्थित होते. त्यांनी ना काही मुद्दा उपस्थित केला ना पोलिसांना कळवले. उलट, पंचायतीच्या मध्यस्थीने त्यांनी हुंड्यामध्ये दिलेले सर्व साहित्य घेतले होते.

**१६.** क्रूर वागणूक किंवा छळ हा मृत्यूच्या आधीच असायला हवा. मृताचे वडील प्रताप सिंह (स.सा.-१) यांनी आपल्या जबानीत असे कथन केले आहे की, लग्नानंतर दोन महिन्यांनी त्यांची मुलगी आई-वडिलांच्या घरी आली आणि तिने सांगितले की, अपीलकर्ता मोटारसायकलची मागणी करत आहे. मात्र, तिला परत पाठविण्यात आले. त्यानंतर ती पुन्हा आली आणि कळविले की, अपीलकर्त्याकडून मोटारसायकलच्या मागणीसाठी दडपण आणले जात असल्याचे सांगितले. मोटारसायकल बरोबरच जमिनीबाबत देखील मागणी करण्यात आली. ज्या घटनांचा उल्लेख करायचा आहे त्या खूप जुन्या असल्याने मृत्यूच्या तत्काळ आधी

अशी कोणतीही मागणी करण्यात आली होती, असे काहीही सदर कथनामध्ये नाही. त्याने त्याच्या उलटतपासणी मध्ये त्याने असे कबूल केले होते की, अंत्यसंस्काराच्या वेळी त्याची सासू आणि त्याचे दोन मेहुणे उपस्थित होते. मात्र, त्यांना तक्रार दाखल ना करण्याबाबत धमकवण्यात आले होते. मृताचे मामा बलबीर सिंग (स.सा.-२) त्यांनी सांगितले की, लग्नाच्या वेळी मृताच्या वडिलांनी पुरेसा हुंडा दिला होता. मात्र, नंतर अपीलकर्त्याने मोटारसायकलची मागणी केल्याचे समजले. त्यांच्या उलटतपासणी मध्ये त्यांनी असे कबूल केले की, ते अपीलकर्त्याच्या घरापासून सुमारे एक फूट अंतरावर राहत होते. मृताच्या लग्नाच्या वेळी हुंड्याची मागणी करण्यात आली नव्हती. मृताच्या सासरच्या घराजवळ राहत असतानाही हुंड्याची मागणी किंवा त्याची पूर्तता न केल्याने होणारा छळ याबाबत मृत व्यक्तीने कधीही आपल्याशी चर्चा केल्याचे त्यांनी सांगितले नाही.

**१७.** मृताची आजी बिरो बाई (स.सा.-३) यांनी आपल्या कथनात सांगितले की, त्यांचे घर अपीलकर्त्याच्या घरापासून एक मैल अंतरावर आहे. ती मृताच्या घरी जात असे. मृत व्यक्तीला वाईट वागणूक दिली जात होती. तिला तिच्या आई-वडिलांच्या घरी जाण्याची परवानगी नव्हती. मृत महिलेने तिला सांगितले की, अपीलकर्ता तिला आजीकडून मोटारसायकल घेऊन येण्यास सांगत होता. फेब्रुवारी १९९५ मध्ये तिच्या पतीच्या मृत्यूनंतर, अपीलकर्त्याने मृत महिलेला तिच्या आजीकडून जमीन घेण्यास सांगितले. त्याने केलेल्या या मागणीवर तिने नकारार्थी उत्तर दिले. मात्र, तिच्या उलटतपासणीमध्ये, तिने असे कथन केले की, तिच्याकडे जमिनीची मागणी केली नव्हती. पुढे, तिने दिलेल्या जबाबामधून असा काही बोध होत नाही की, मृत्यूपूर्वी अपीलकर्ता किंवा त्याच्या कुटुंबीयांनी मयतास कोणतीही क्रूर वागणूक दिली होती किंवा तिचा छळ केला होता. जे काही कथन केले गेले आहे, ते केवळ मागणीबद्दल

आहे. सदर साक्षीदार मृताच्या घरापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर राहत होती आणि तिची आजी असूनही, कोणत्याही क्रूर वागणुकीची किंवा छळवादाचा तपशील माहित नव्हता.

**१८.** जोगिंदर सिंग (स.सा. -४) हा अभियोग पक्षाने सादर केलेला आणखी एक साक्षीदार आहे, जो मृताचा मामा आहे. त्याला उलटलेला साक्षीदार म्हणून घोषित करण्यात आले.

**१९.** राजिंदर सिंग (स.सा.-५), उप निरीक्षक हे रितसर साक्षीदार होते, ज्यांनी केवळ एफ.आय.आर नोंदविला होता आणि आरोपीला अटक केली होती.

**२०.** बब्बन सिंह (स.सा. – ६), मंडळ अधिकारी, फरीदपूर, हे तपास अधिकारी होते.त्यांच्या सरतपासणी मध्ये, त्यांनी जगीर सिंगचा जबाब नोंदवल्याची कबुली दिली. पोलिसांकडे नोंदविलेल्या तक्रारीनुसार, ही तिच व्यक्ति आहे, ज्याने मयताच्या वडिलांना त्यांच्या मुलीच्या मृत्युबाबत कळविले होते. मात्र, त्याला पुराव्यामध्ये हजर करण्यात आले नव्हते.

**२१.** अभियोग पक्षाने सादर केलेल्या वरील पुराव्यांमध्ये, कोणत्याही साक्षीदाराने मृत्यूपूर्वी हुंड्याच्या मागणीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणास्तव अपीलकर्ता किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने मयत व्यक्तीस क्रूर वागणूक दिली किंवा तिचा छळ केल्याचे कथन केलेले नाही. उलट, छळ केला गेला याबाबत कोणीही कथन केलेले नाही. मोटारसायकल आणि जमिनीच्या मागणीबाबत काही तोंडी दृढ कथन हे घटनेच्या खूप आधीची गोष्ट आहे. अभियोग पक्षाने उपरोक्त पुरावे हे भा.दं. वि. च्या कलम ३०४ बी आणि भारतीय पुरावा कायद्याच्या कलम कलम ११३ बी अंतर्गत गृहितकास आवाहन करण्याच्या पूर्वअटींची पूर्तता करत नाहीत. आय.पी.सीच्या कलम ४९८ ए मधील घटकही त्याच कारणास्तव लागू होत

नाहीत, कारण, मयत महिलेच्या मृत्यूपूर्वी तिला क्रूर वागणूक दिली होती आणि तिचा छळ केला होता असा कोणताही पुरावा नाही.

**२२.** बचाव पक्षाने गुरमेज सिंगला डी. डब्ल्यू. - १ म्हणून सादर केले होते, जे घटनेच्या वेळी गावचे प्रमुख होते. त्यांनी असे सांगितले की, मयताच्या मृत्यूची माहिती मयताच्या आई-वडील आणि कुटुंबातील इतर सदस्यांना कळविण्यात आली होती. त्यांनी पुढे असे सांगितले की, अंत्यसंस्कारानंतर, मयताचे सामान तिच्या आजी आणि मामांच्या ताब्यात देण्यात आले होते. त्यांचे हे कथन आजी बिरो बाई (स.सा-३), बलबीर सिंग (स.सा-२) यांनी दिलेल्या कबुलीच्या कथनाशी सुसंगत आहे. त्याचा अर्थ असा होतो की, मयताच्या मृत्यूबाबत कोणताही संशय नव्हता.

**२३.** अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांचे सामूहिक मूल्यमापन केल्यावर, आमचे असे मत आहे की, भा.दं. सं. च्या ३०४ बी आणि भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ११३ बी अंतर्गत गृहीतक उपस्थित करण्याच्या पूर्वअटीची पूर्तता झाली नाही, त्यामुळे अपीलकर्त्याच्या शिक्षेचे कायदेशीररित्या समर्थन करू शकत नाही. केवळ लग्नानंतर सात वर्षांच्या आत सासरच्या घरात मयत व्यक्तीचा मृत्यू अनैसर्गिक असणे आरोपीला भा.दं.वि च्या कलम ३०४ बी आणि ४९८ ए अन्वये दोषी ठरविण्यासाठी पुरेसे ठरणार नाही. मृत्यूचे कारण समजू शकले नाही.

**२४.** वर नमूद केलेल्या कारणांमुळे, आमच्या मते, भा.द.सं. च्या कलम ३०४ बी, ४९८ ए आणि २०१ अंतर्गत अपीलकर्त्याची अपराधसिद्धी आणि शिक्षा कायदेशीररित्या कायम करता येत नाही. त्याअनुषंगाने अपील मंजूर केले जात आहे. उच्च न्यायालयाचा आक्षेपित

न्यायनिर्णय हा रद्दबातल केला जात आहे. जमानतपत्र रद्द करण्यात येत आहे.

**x-x-x-x-x-x-x-x**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**